भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.२७१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १५/०४/२०१७

१) घराचा ताला तोडुन सोन्याचे साहित्य व नगदी पैश्याची चोरी . :–

दिनांक १३/०४/२०१७ चे २२.३० ते १४/०४/२०१७ चे ०९.२७ पर्यत यातील फिर्यादी सुरेश वसंता रामतीर्थकर वय ५४ वर्ष रा. सुयोग नगर राजेदहेगाव हे आपले घराला ताला लावुन कुटुंबासह बाहेरगावी नागपुर येथे गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन घराचे समोरील दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करुन घरातील बेडरुम मधील लोखंडी आलमारी व लाकडी सोकेसचे ड्रॉप मध्ये ठेवलेला सोन्याचा हार १५ ग्रॅम, सोन्याचा मंगळसुत्र २५ ग्रॅम, सोन्याचा गोप १५, सोन्याचे टॉप्स ५ जोडी २० ग्रॅम, सोन्याच्या अंगठया २ नग १२ ग्रॅम, सोन्याचा पदक २ नग ७ ग्रॅम, नगदी ५,०००/–रु. असा एकुण १,४६,०००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. पाटील पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहे.

२) नागमंदीरातील दान पेटीतुन चोरी करतांना व त्यांची अंगझडती दरम्यान पैसे मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक १४/०४/२०१७ चे ०६.०० वा. दरम्यान यातील आरोपी हा हनुमान तलाव समोरील नागमंदीरातील दान पेटी खोलतांनी मिळुन आल्याने त्यांची अंगझडती घेतली असता त्याचे जवळ ४६०/–रु. मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी सफौ. शहारे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३७९,५११ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गोंडाने पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

३) मोटार सायकलची चोरी . :–

दिनांक १३/०४/२०१७ चे २३.३० ते १४/०४/२०१७ चे ०५.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी तेजराम टिकाराम रिनायते वय ५७ वर्ष, रा. बोरगाव यांनी आपली हिरो होंडा स्पलेंडर प्लस डिआरके मोटार सायकल क्र. एमएच ३६ एम ९२२४ किंमती २०,०००/–रु. ची सु. बो. दवाखाना मोटार सायकल पार्कीग येथे लॉक न करता ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोराने चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. शहारे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

४) संगनमत करुन रेती चोरुन नेल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक १३/०४/२०१७ चे १८.३० ते १४/०४/२०१७ चे ०८.०० वा. दरम्यान यातील आरोपी तिन्ही ट्रक चालकांनी मालका सोबत ट्रक मध्ये प्रत्येकी ४ ब्रास रेती एकुण १२ ब्रास रेती किंमती २४,०००/–रु. ची चोरी करुन घेवुन गेल्याने फिर्यादी सुखदेव खुशालराव वासनिक वय ५५ वर्ष, रा. तहसिल कार्यालय पवनी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७९,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. बिसने पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

५) अल्पवयीन मुलगी घरुन निघुन गेल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक १३/०४/२०१७ चे १३.०० वा. दरम्यान यातील फिर्यादीची मुलगी ही घरी कोणाला काही न सांगता घरुन निघुन गेल्याने मुलगी ही १८ वर्षा खाली असल्याने म. रा. परीपत्रक क्र. सीआरटीपीओ ९१२ प्र.क्र. ५४/पोल –१३ गृह विभाग १०/११/२०१४ च्या आदेशान्वये तसेच तिला कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावुन पळवुन नेले असावे असे फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३६३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोंदे पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

६) अवैध दारु अडयांवर धाडी . :–

दिनांक १४/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो स्टे गोबरवाही येथे अवैध दारु अडयांवर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ८४३ लिटर ४८० मिली देशी/ विदेशी/ बिअर+१ ओमणी मारुती कार किंमती २,५१,५४०/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.